सकाळ
गुरुवार, २७ सप्टेंबर २०१८ | ७

# सूत्रसंचालन क्षेत्राचा करिअर म्हणून विचार करा : मुसळे

राजगुरुनगर, ता. २६ : जीवनातील अनेक प्रसंग व उपक्रमांचे 'सेलिब्रेशन' करण्याची समाजाची प्रवृत्ती वाढत असल्याने विद्यार्थ्यांनी सूत्रसंचालक, मुलाखतकार या क्षेत्रांचा करिअर म्हणून विचार करायला हवा, असे मत प्रसिद्ध निवेदक कैलास मुसळे यांनी व्यक्त केले.

हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात मराठी विभाग व मराठी वाङ्मय मंडळाच्या वतीने आयोजित सूत्रसंचालन कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. मुसळे म्हणाले, सूत्रसंचालक हा केवळ दोन वक्त्यांमधील दुवा नसून व्यासपीठ आणि श्रोते यांच्यातील



राजगुरुनगर (ता. खेड) : सूत्रसंचालन कार्यशाळेत विद्यार्थ्यांशी संवाद साधताना कैलास मुसळे.

संवाद साधणारा सेतू असतो. संवादामध्ये रंजकता आणून समर्पक शब्दांनी श्रोत्यांना गुंतवून ठेवून कार्यक्रम खुलविण्याचे कौशल्य सूत्रसंचालकाकडे हवे असून त्यासाठी भाषेवर प्रभुत्व, बोलण्यातील चतुर्थ, ओघवती वाणी, प्रसन्न व्यक्तिमत्त्व, उत्तम संवाद कौशल्य या गोष्टी त्याने आत्मसात करायला हव्यात.

या वेळी निवेदक कैलास दुधाळे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा. किशोर लांडे पाटील, प्रा. दिलीप मुळूक, प्रा. सारिका निकम आदी उपस्थित होते.

या कार्यशाळेत विद्यार्थ्यांना ध्वनिक्षेपकावर बोलण्याचे व आवाजातील चढ उताराचे प्रात्यक्षिक देण्यात आले. प्रास्ताविक व सूत्रसंचालन मराठी विभागप्रमुख डॉ. संजय शिंदे यांनी केले, तर आभार मराठी वाङ्मय मंडळ प्रमुख डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी मानले.

लोकमत पुणे, बुधवार, दि. २६ सप्टेंबर २०१८

# राजगुरु महाविद्यालयात सूत्रसंचालन कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

खेड : हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात मराठी विभाग व मराठी वाङ्मय मंडळाच्या वतीने आयोजित एकदिवसीय सूत्रसंचालन कार्यशाळा पार पडली.

या वेळी प्रसिद्ध निवेदक कैलास मुसळे यांनी सूत्रसंचालन या क्षेत्रात करिअरच्या मोठ्या संधी उपलब्ध होत असून विद्यार्थ्यांनी सूत्रसंचालक, निवेदक, मुलाखतकार या क्षेत्रांचा करिअर म्हणून विचार करायला हवा, असे आवाहन केले.

या वेळी निवेदक कैलास दुधाळे, कला शाखेचे उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा. किशोर लांडेपाटील, प्रा. दिलीप मुळूक, डॉ. बाळासाहेब अनुसे, प्रा. सारिका निकम व प्रथम वर्ष कला शाखेतील विद्यार्थी उपस्थित होते.

कैलास मुसळे म्हणाले, "सूत्रसंचालक हा केवळ दोन वक्त्यांमधील दुवा नसून व्यासपीठ आणि श्रोते यांच्यातील संवाद साधणारा सेतू असतो. संवादामध्ये रंजकता आणून समर्पक शब्दांनी श्रोत्यांना गुंतवून ठेवून कार्यक्रम खुलविण्याचे कौशल्य सूत्रसंचालकाकडे हवे."

मराठी विभागप्रमुख डॉ. संजय शिंदे यांनी प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले. मराठी वाङ्मय मंडळप्रमुख डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी आभार मानले. कार्यक्रमाला मोठ्या प्रमाणात नागरिकांची उपस्थिती होती.

**पुढारी** | पुणे, बुधवार २६ सप्टेंबर २०१८



राजगुरू महाविद्यालयात मार्गदर्शन करताना मान्यवर.

## राजगुरू महाविद्यालयात कार्यशाळा

**राजगुरुनगर :** सूत्रसंचालन या क्षेत्रात करिअरच्या खूप संधी उपलब्ध होत असून, विद्यार्थ्यांनी सूत्रसंचालक, निवेदक, मुलाखतकार या क्षेत्रांचा करिअर म्हणून विचार करायला हवा, असे आवाहन निवेदक कैलास मुसळे यांनी केले. येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभाग व मराठी वाङ्मय मंडळाच्या वतीने एकदिवसीय सूत्रसंचालन कार्यशाळेचे आयोजन केले होते. त्या कार्यशाळेचे उद्घाटन निवेदक कैलास मुसळे यांच्या हस्ते करण्यात आले. निवेदक कैलास दुधाळे, कला शाखेचे उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा. किशोर लांडे पाटील, प्रा. दिलीप मुळुक, डॉ. बाळासाहेब अनुसे, प्रा. सारिका निकम व प्रथम वर्ष कला शाखेतील विद्यार्थी उपस्थित होते. कार्यशाळेत कैलास मुसळे यांनी 'सूत्रसंचालन : एक कला', कैलास दुधाळे यांनी 'सूत्रसंचालनाची तयारी', डॉ. संजय शिंदे यांनी 'सूत्रसंचालनासाठी आवश्यक गुण' आणि डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी 'सूत्रसंचालनाचे स्वरूप व प्रकार' या विषयावर मार्गदर्शन केले. या कार्यशाळेत कृतिसत्राचे आयोजन करताना विद्यार्थ्यांना ध्वनिक्षेपकावर बोलण्याचा अनुभव व आवाजातील चढ- उताराचे प्रात्यक्षिक देण्यात आले. मराठी विभागप्रमुख डॉ. संजय शिंदे यांनी प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले. मराठी वाङ्मय मंडळप्रमुख डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी आभार मानले.

**जनप्रवास**

रविवार, दि. ०७ ऑक्टोबर २०१८

## राजगुरू महाविद्यालयात सूत्रसंचालन कार्यशाळेचे आयोजन

**राजगुरुनगर । वार्ताहर**

कौटुंबिक अथवा इतर सर्वच कार्यक्रम सार्वजनिकरित्या साजरे करण्याची समाजाची वाढती वृत्ती लक्षात घेता भविष्यात कार्यक्रम संयोजनांतर्गत सूत्रसंचालन या क्षेत्रात करिअरच्या खूप संधी उपलब्ध होत असून विद्यार्थ्यांनी सूत्रसंचालक, निवेदक, मुलाखतकार या क्षेत्रांचा करिअर म्हणून विचार करायला हवा असे आवाहन निवेदक कैलास मुसळे यांनी केले. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभाग व मराठी वाङ्मय मंडळाच्या वतीने आयोजित एकदिवसीय सूत्रसंचालन कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते. या प्रसंगी कला शाखेचे उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा. किशोर लांडेपाटील, प्रा. दिलीप मुळूक, डॉ. बाळासाहेब अनुसे, प्रा. सारिका निकम व प्रथम वर्ष कला शाखेतील विद्यार्थी उपस्थित होते.



राजगुरूनगर येथील हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात सूत्रसंचालन कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना कैलास मुसळे.

कैलास मुसळे पुढे म्हणाले की, सूत्रसंचालक हा केवळ दोन वक्त्यांमधील दुवा नसून व्यासपीठ आणि श्रोते यांच्यातील संवाद साधणारा सेतू असतो. संवादामध्ये रंजकता आणून समर्पक शब्दांनी श्रोत्यांना गुंतवून ठेऊन कार्यक्रम खुलविण्याचे कौशल्य सूत्रसंचालकाकडे हवे असून त्यासाठी भाषेवर प्रभुत्व, बोलण्यातील चातुर्य, ओघवती वाणी, प्रसन्न व्यक्तिमत्त्व, उत्तम संवाद कौशल्य या गोष्टी त्याने आत्मसात करायला हव्यात असे ते म्हणाले. या कार्यशाळेत कैलास मुसळे यांनी सूत्रसंचालन एक कला, कैलास दुधाळे यांनी सूत्रसंचालनाची तयारी, डॉ.संजय शिंदे यांनी सूत्रसंचालनासाठी आवश्यक गुण आणि डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी सूत्रसंचालनाचे स्वरूप व प्रकार या विषयावर विद्यार्थ्यांना माहिती दिली. या कार्यशाळेत कृतिसत्राचे आयोजन करताना विद्यार्थ्यांना ध्वनिक्षेपकावर बोलण्याचा अनुभव व आवाजातील चढ उताराचे प्रात्यक्षिक देण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन मराठी विभाग प्रमुख डॉ. संजय शिंदे यांनी तर आभार मराठी वाङ्मय मंडळ प्रमुख डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी मानले.

केसरी पुणे, ७ ऑक्टोबर २०१८

# राजगुरू महाविद्यालयात सूत्रसंचालन कार्यशाळेचे आयोजन

राजगुरुनगर, (वार्ताहर) : कौटुंबिक अथवा इतर सर्वच कार्यक्रम सार्वजनिकरित्या साजरे करण्याची समाजाची वाढती वृत्ती लक्षात घेता भविष्यात कार्यक्रम संयोजनांतर्गत सूत्रसंचालन या क्षेत्रात करिअरच्या खूप संधी उपलब्ध होत असून विद्यार्थ्यांनी सूत्रसंचालक, निवेदक, मुलाखतकार या क्षेत्रांचा करिअर म्हणून विचार करायला हवा असे आवाहन निवेदक कैलास मुसळे यांनी केले. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभाग व मराठी वाङ्मय मंडळाच्या वतीने आयोजित एकदिवसीय सूत्रसंचालन कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते.

या प्रसंगी कला शाखेचे उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा. किशोर लांडेपाटील, प्रा. दिलीप मुळूक, डॉ. बाळासाहेब अनुसे, प्रा. सारिका निकम व प्रथम वर्ष कला शाखेतील विद्यार्थी उपस्थित होते. कैलास मुसळे पुढे म्हणाले की, सूत्रसंचालक हा केवळ दोन वक्त्यांमधील दुवा नसून व्यासपीठ आणि श्रोते यांच्यातील संवाद साधणारा सेतू असतो. संवादामध्ये रंजकता आणून समर्पक शब्दांनी श्रोत्यांना गुंतवून ठेऊन कार्यक्रम खुलविण्याचे कौशल्य सूत्रसंचालकाकडे हवे असून त्यासाठी भाषेवर प्रभुत्व, बोलण्यातील चातुर्य, ओघवती वाणी, प्रसन्न व्यक्तिमत्त्व, उत्तम संवाद कौशल्य या गोष्टी त्याने आत्मसात करायला हव्यात असे ते म्हणाले.

या कार्यशाळेत कैलास मुसळे यांनी सूत्रसंचालन एक कला, कैलास दुधाळे यांनी सूत्रसंचालनाची तयारी, डॉ. संजय शिंदे यांनी सूत्रसंचालनासाठी आवश्यक गुण आणि डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी सूत्रसंचालनाचे स्वरूप व प्रकार या विषयावर विद्यार्थ्यांना माहिती दिली. या कार्यशाळेत कृतिसत्राचे आयोजन करताना विद्यार्थ्यांना ध्वनिक्षेपकावर बोलण्याचा अनुभव व आवाजातील चढ उताराचे प्रात्यक्षिक देण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन मराठी विभाग प्रमुख डॉ. संजय शिंदे यांनी तर आभार मराठी वाङ्मय मंडळ प्रमुख डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी मानले.

२८ सप्टेंबर ते ४ ऑक्टोबर २०१८/२

# राजगुरू महाविद्यालयात सूत्रसंचालन कार्यशाळा

राजगुरुनगर, (प्रतिनिधी) - कौटुंबिक अथवा अन्य सर्वच कार्यक्रम सार्वजनिकरित्या साजरे करण्याची समाजाची वाढती वृत्ती लक्षात घेता भविष्यात कार्यक्रम संयोजनांतर्गत सूत्रसंचालन या क्षेत्रात करिअरच्या खूप संधी उपलब्ध होत असून, विद्यार्थ्यांनी सूत्रसंचालक, निवेदक, मुलाखतकार या क्षेत्रांचा करिअर म्हणून विचार करायला हवा, असे आवाहन निवेदक कैलास मुसळे यांनी केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभाग व मराठी वाङमय मंडळाच्या वतीने आयोजित एकदिवसीय सूत्रसंचालन कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते.

या प्रसंगी निवेदक कैलास दुधाळे, कला शाखेचे उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा. किशोर लांडे पाटील, प्रा. दिलीप मुळूक, डॉ. बाळासाहेब अनुसे, प्रा. सारिका निकम व प्रथम वर्ष कला शाखेतील विद्यार्थी उपस्थित होते.

कैलास मुसळे पुढे म्हणाले की, सूत्रसंचालक हा केवळ दोन वक्त्यांमधील दुवा नसून, व्यासपीठ आणि श्रोते यांच्यातील संवाद साधणारा सेतू असतो. संवादामध्ये रंजकता आणून समर्पक शब्दांनी श्रोत्यांना गुंतवून ठेऊन कार्यक्रम खुलविण्याचे कौशल्य सूत्रसंचालकाकडे हवे. त्यासाठी भाषेवर प्रभुत्व, बोलण्यातील चातुर्य, ओघवती वाणी, प्रसन्न व्यक्तिमत्त्व, उत्तम संवाद कौशल्य या गोष्टी त्याने आत्मसात करायला हव्यात असे ते म्हणाले.

या कार्यशाळेत कैलास मुसळे यांनी सूत्रसंचालन एक कला, कैलास दुधाळे यांनी सूत्रसंचालनाची तयारी, डॉ. संजय शिंदे यांनी सूत्रसंचालनासाठी आवश्यक गुण आणि डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी सूत्रसंचालनाचे स्वरूप व प्रकार या विषयावर विद्यार्थ्यांना माहिती दिली. या कार्यशाळेत कृतिसत्राचे आयोजन करताना विद्यार्थ्यांना ध्वनिक्षेपकावर बोलण्याचा अनुभव व आवाजातील चढ उताराचे प्रात्यक्षिक देण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन मराठी विभाग प्रमुख डॉ. संजय शिंदे यांनी केले. मराठी वाङमय मंडळ प्रमुख डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी आभार मानले.